रायगड, नवी मुंबई


◆ वर्ष १६ ◆ अंक ११६


www.ramprahar.com

# राम प्रहर

रविवार, १२ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २











# महाराष्ट्राच्या सर्वस्पर्शी विकासाचे स्वप्न साकारूया

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून दिवाळीच्या शुभेच्छा

**मुंबई : प्रतिनिधी**

आपल्या महाराष्ट्राच्या सर्वस्पर्शी विकासाचे स्वप्न साकार व्हावे यासाठी आणि जगाने गौरवपूर्ण वाटचालीची दखल घ्यावी यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करूया, असा निर्धार व्यक्त करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील जनतेला दिवाळीच्या मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

दीपोत्सवाचं हे पर्व सर्वांच्या आयुष्यात मांगल्य आणि समृद्धी घेऊन येवो. सर्वांच्या आशा-आकांक्षा आणि संकल्प पुर्ण व्हावेत अशी मनोकामनादेखील मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे की, आपल्या महाराष्ट्रावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या आशीर्वादाचं छत्र आहे. त्यांनी राज्यकारभार, सामाजिक सुधारणांचा आणि जनकल्याणाचा आदर्श, धडा घालून दिला आहे. त्या प्रकाशवाटेवरूनच आपण वाटचाल करत आहोत. या वाटचालीत आम्ही राज्याच्या विकासाला गती लाभेल, आपल्या नागरिकांचे जीवनमान उंचावेल असे अनेक निर्णय घेतले आहेत. ज्येष्ठांपासून ते शाळकरी मुलांपर्यंत, माता-भगिनी, शेतकरी, कामगार



आणि कष्टकरी यांच्या जीवनात या विकासाचं प्रतिबिंब उमटेल असे प्रयत्न केले आहेत, असेही त्यांनी नमूद केले आहे.

मुख्यमंत्री पुढे म्हणतात, 'आपण महाराष्ट्राच्या सर्वस्पर्शी विकासाचे स्वप्न पाहिले आहे. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास हा आमचा ध्यास आहे. शिवछत्रपतींचा, जिजाऊ माँसाहेब यांचा हा महाराष्ट्र केवळ देशातील अन्य राज्यांसाठी नव्हे, तर जगाने दखल घ्यावी अशी गौरवपूर्ण वाटचाल करत राहील, असे आमचे प्रयत्न आहेत. या प्रयत्नात महाराष्ट्र कुठेही मागे राहणार नाही, त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू, असे अभिवचनही यानिमित्ताने देतो.'

'राज्यातील जनतेच्या आयुष्यात आनंद यावा, त्यांची स्वप्ने साकार व्हावीत म्हणून आपले सरकार लोकांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करते आहे आणि पुढे देखील करीत राहील, असा विश्वास व्यक्त करून मुख्यमंत्र्यांनी आवाहन केले आहे की, 'दिवाळी आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात आनंद आणि चैतन्य घेऊन येते. आपण त्याच उत्साहानं हा प्रकाशाचा उत्सव साजरा करूया. आपण निसर्गपूजक आहोत. आपले सण देखील तोच संदेश देतात. म्हणूनच स्वच्छतेचा कटाक्ष बाळगूया, प्रदूषण टाळूया. सणांचा आनंद घेतांना पर्यावरणाची काळजी घेण्याची जबाबदारी सुद्धा आपली सगळ्यांची आहे हे लक्षात ठेवून सण साजरा करूया.'

# नोकरभरतीच्या नावाने फसवणूक

## नवी मुंबई महापालिकेतर्फे सतर्कतेचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेमध्ये कोणतीही भरती प्रक्रिया सुरू नाही. याची दखल घेऊन फसवणूक होणार नाही, याची दक्षता घेण्याचे नागरिकांना नवी मुंबई पालिकेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

नवी मुंबई महापालिकेमध्ये अधिकारी, कर्मचारी यांची भरती सुरू असून तशा प्रकारच्या खोट्या जाहिराती, सूचना प्रसारित करण्यात येत असल्याची माहिती प्राप्त झालेली आहे. याबाबत काही व्यक्ती अथवा संस्थांकडून नवी मुंबई महापालिकेच्या बोधचिन्हाचा तसेच महापालिकेचा खोटा स्टॅम्प बनवून त्याचाही वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. वास्तविकत: नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये सध्या कोणत्याही पदासाठीची भरती प्रक्रिया सुरू नाही. त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या माहितीला अथवा जाहिरातींना बळी पडू नये व प्रतिसाद देऊ नये तसेच संभाव्य आर्थिक नुकसान टाळावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

नवी मुंबई महापालिकेमधील भरती किंवा कोणत्याही अधिकृत माहितीसाठी नागरिकांनी महापालिकेची वेबसाईट https://www.nmmc.gov.in यावर तसेच महापालिकेच्या अधिकृत फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम पेजला भेट द्यावी, असे आवाहन नमुंमपा प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# अमली पदार्थाची विक्री करणारा पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील ओवे गाव येथील स्मशानभूमीजवळ मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ विक्री करण्यासाठी आलेल्या व्यक्तीला अमली पदार्थ विरोधी पथकाने सापळा लावून जेरबंद केले आहे. शफी अहमद इक्बाल अहमद शेख (वय ४६) असे या व्यक्तीचे नाव असून अमली पदार्थ विरोधी पथकाने त्याच्याजवळ असलेला ५२ ग्रॅम वजनाचा पाच लाख २० हजार रुपये किमतीचा एमडी हा अमली पदार्थ जप्त केला आहे.

खारघरमधील ओवे गाव येथील स्मशानभूमीजवळ एक व्यक्ती अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार ओवे गाव येथील स्मशानभूमीजवळ सापळा लावला होता. या ठिकाणी शफी अहमद इक्बाल अहमद शेख हा संशयास्पदरीत्या आल्यानंतर अमली पदार्थ विरोधी पथकाने त्याची धरपकड केली. त्यानंतर पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याजवळ एमडी पदार्थ मिळून आला. त्यानंतर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

# ज्येष्ठ नागरिकांतर्फे गणेश म्हात्रे यांचा सत्कार




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप पनवेल शहर मंडल प्रभाग क्रमांक १४ अध्यक्षपदी गणेश म्हात्रे यांची फेरनियुक्ती भाजप शहर मंडल अध्यक्ष व माजी नगरसेवक अनिल भगत यांनी लेखी पत्राद्वारे केल्याबद्दल साईनगर प्रभाग क्रमांक १४मधील ज्येष्ठ नागरिकांतर्फे नुकताच त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी ज्येष्ठ नागरिक बाळाराम गोसावी, पांडुरंग काळप, गणपत कांबळे, मनोहर कदम, राजेंद्र सोनवणे आणि लेखक व मुक्त पत्रकार दिलीप रेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून म्हात्रे यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पनवेलमध्ये रांगोळी कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी सणाचे औचित्य साधून साईनगर पनवेल येथे ग्रीन अबोडे सोसायटीत प्रसिद्ध रांगोळी आर्टिस्ट चेतन भगत यांच्यामार्फत रांगोळी कार्यशाळा गुरुवारी (दि. ९) आयोजित करण्यात आली होती.



या कार्यशाळेत त्यानी महिलांना रांगोळी बाबत छान पद्धतीने योग्य ते मार्गदर्शन केले. त्यांच्याकडून रांगोळीची प्रॅक्टिस करून घेतली. तसेच मोठया रंगीत रांगोळ्या काढून घेतल्या. रांगोळी मधील रंगसंगती आणि त्यातली बारकावे खूप छान प्रकारे समजावून सांगीतले. त्यामुळे या सर्व महिला खूप प्रभावित झाल्या. रांगोळी आणि दिवाळी याचे अतूट नाते निर्माण झाले आहे. कोणतेही धार्मिक कार्य असो, रांगोळी शिवाय शोभा येत नाही. महिलांना तर रांगोळी प्रिय असते. तसेच लहान मुलांसाठी पणती रंगविणे, डेकोरेशन करणे, आकाशकंदील बनविणे याची कार्यशाळा याप्रसंगी आयोजीत करण्यात आली होती. तसेच इमारतीच्या प्रवेश द्वारावर लहान मुलांनी किल्लादेखील बनविला.

या दोन्ही कार्यशाळेला महिला व लहान मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या दोन्ही कार्यशाळा आयोजित करण्यासाठी हर्षा मानकामे, निलम कामठे, वैशाली नाझरे आणि माधवी माने यांनी विशेष मेहनत घेतली.




**पनवेल : भाजप शहर मंडल अंतर्गत पदाधिकाऱ्यांना मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या अंतर्गत अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष रावसाहेब खरात यांनाही नियुक्तीचे पत्र देण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, अॅड. प्रकाश बिनेदार, शहर मंडल अध्यक्ष अनिल भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदी उपस्थित होते.**

# खैरणे कातकरी पाड्यावर दिवाळी

## आमदार गणेश नाईक यांची उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळीचा आनंद प्रत्येकजण आपल्यापरीने साजरा करीत असतो. प्रकाशाच्या या उत्सवाला सामाजिक बांधिलकीचे कोंदण देत खैरणे येथील कातकरी पाड्यावर आदिवासी बांधवांसोबत आमदार गणेश नाईक यांच्या उपस्थितीमध्ये दिवाळी उत्साहात साजरी करण्यात आली.



लोकनेते आमदार नाईक यांच्या समवेत माजी खासदार संजीव नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, युवा नेते संकल्प नाईक, स्थानिक माजी नगरसेवक शशिकांत भोईर, माजी नगरसेवक चंद्रकांत डोळे, नगरसेवक चंद्रकांत पाटील व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

कातकरी पाड्यातील बांधवांना साड्या आणि कपडे त्याचबरोबर विद्यार्थ्यांना पुस्तकांबरोबर मिठाईचे वाटप करून या सर्वांची दिवाळी गोड करण्यात आली. या वेळी कातकरी पाडा येथील आदिवासी बांधवांचे आणि मुलांचे चेहरे आनंदाने फुलून गेले होते. नवी मुंबईमध्ये दिघ्यापासून बेलापूरपर्यंत विविध ठिकाणी आदिवासी पाडे आहेत यामधून वारली, कातकरी इत्यादी जमातीचे आदिवासी बांधव वर्षानुवर्ष राहत आहेत. निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासी बांधवांनी आजही आपली संस्कृती टिकवून ठेवली आहे. लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी आजतागायत नवी मुंबईमध्ये आदिवासी समाजाच्या कल्याणाच्या योजना राबवून या समाजाचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केलेला आहे. महापालिकेच्या माध्यमातून आदिवासींसाठी मोफत घरकुल योजना राबविण्यात आली. कुडाच्या खोल्यांमधून आदिवासी बांधव पक्क्या घरांमध्ये राहण्यास गेले. त्यांचे जीवनमान उंचावले. या समाजासाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या.

आदिवासी पाड्यांमध्ये शाळा, समाज मंदिरे, आरोग्य केंद्रे अशा आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जेणेकरून या समाजाच्या मनातील दुर्लक्षित झाल्याची भावना नाहीशी होऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होईल. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले.

> **आदिवासी समाजातील मुलेदेखील शिक्षण घेऊन नावलौकिक कमावतील, प्रशासकीय यंत्रणेमध्ये मोठ्या हुद्द्यावर जातील. त्याचबरोबर देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ सबका विकास' या धोरणानुसार आम्ही कार्यरत आहोत.**
>
> **-आमदार गणेश नाईक**

**पान १ वरुन**

# आर्या आंबेकरच्या सुरेल मैफिलीने पनवेलकर मंत्रमुग्ध

माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष राजेश्री वावेकर, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, वृषाली वाघमारे, मंदा भगत, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, रायगड भूषण उमेश चौधरी, ज्येष्ठ कार्यकर्ते अजय कांडपिळे, भाजपचे कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, चिन्मय समेळ, रोहित जगताप, अमोल खेर, अभिषेक भोपी, गणेश जगताप, वैभव बुवा, अक्षय सिंग, आदित्य उपाध्याय यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक, कला, संगीत, वैद्यकीय, विधी आदी क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यंदा दिवाळी पहाटचे सातवे वर्ष होते. यामध्ये झी मराठी लिटिल चॅम्प फेम आर्या आंबेकर व सहकाऱ्यांनी सुश्राव्य गाण्यांची सुमधूर मैफिल सादर केली. एकाहून एक गीते सादर करीत त्यांनी रसिकांची वाहवा मिळवली, तर या सोहळ्याचे निवेदनही तेवढ्याच खुमासदार पद्धतीने अभिजित कुलकर्णी यांनी केले. या वेळी वाद्यवृंदाची साथही तेवढीच ताकदीची होती. अमेय ठाकूर, प्रथम कुलकर्णी, श्री. अनिल, झंकार कानडे, श्री. सागर, सिद्धार्थ कदम यांनी वाद्यवृंदावर साथ दिली.

दीपावली म्हणजे दिव्यांचा, संस्कृतीचा आणि आनंदाचा उत्सव. यानिमित्त लहानग्यांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वत्र विविध आनंदमयी कार्यक्रमांची रेलचेल पहायला मिळते. त्यात सुरांच्या आविष्कारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच अनुषंगाने सादर झालेल्या 'दिवाळी पहाट'ने वातावरण प्रफुल्लित केले. या वेळी वडाळे तलाव परिसर हजारो श्रोत्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने गजबजला होता. या तलावाच्या सौंदर्याने आणि निर्सगाच्या सानिध्यात झालेल्या मैफिलीने पहाट ते कोवळ्या उन्हाच्या साक्षीने तेजोमय संगीत बहरले.

या वेळी आर्या आंबेकर व सहगायक सौरभ यांनी विविध गाणी सादर करून वातावरण संगीतमय केले. गणनायका, श्रीरामाच्या पूजेसाठी आज अयोध्या सजली, विठ्ठला तू वेडा कुंभार, घेत असे जन्मा, कधी रे येशील तू, केव्हा तरी पहाटे, त्या फुलांचा गंध, तुला न कळले, येशील परतून, कितीदा नव्याने तुला आठवावे, केवड्याचे पान तू, हृदयात वाजे समथिंग, मन उधाण वाऱ्याचे आदी अभंग, भक्तीगीते, भावगीते, चित्रपट गाणी, इतर गीते सादर होताना पनवेलकर रसिक प्रेक्षकांनी गायकांना भरभरून दाद दिली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमस्थळी लहानग्यांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्यक्ष सहा हजारहून अधिक रसिकांनी, तर थेट प्रक्षेपणातूनही हजारो रसिकांनी या संगीत मेजवानीचा आस्वाद घेतला.

# शिवा संघटनेचा राज्यव्यापी मेळावा

**उरण : बातमीदार**

शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे २६ नोव्हेंबर २०२३ रोजी २८वा राज्यव्यापी मेळावा श्री क्षेत्र कपिलधार, जिल्हा बीड येथे दुपारी ३:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. श्री मन्मथ स्वामींची २२ वी शासकीय महापूजा शासनातर्फे मोठ्या उत्साहात साजरे केले जाणार आहे.

शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेतर्फे आयोजित राज्यव्यापी मेळाव्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अनेक समाज बांधवांना या वेळी शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

दरवर्षी शिवा संघटनेच्या राज्यव्यापी मेळाव्याला मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यातून हजारो शिवा संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित असतात. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री क्षेत्र कपिलधार, जिल्हा बीड, महाराष्ट्र राज्य येथे जाण्यासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड जिल्ह्यातून वाहनांची सोय केली आहे.

# दिवाळीनिमित्त गडकिल्ल्यांतून शिवरायांच्या इतिहासाला उजाळा

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जपण्याच्या हेतूने जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये बच्चे कंपनीने किल्ले बनवून शिवाजी महाराजांचा इतिहास जपण्याचा प्रयत्न केला आहे. सोशल मीडियाच्या युगात वावरणारी ग्रामीण भागातील बच्चे कंपनी आजही किल्ले बनविण्याच्या विधायक उपक्रमात स्वतःला गुंतवताना दिसत आहे.

दिवाळी हा सण आनंदाचा आणि बच्चे कंपनीच्या आवडीचा सण आहे. दिवाळी सुरू होण्यापूर्वीच म्हणजे शाळेच्या सहामाही परीक्षा संपल्या संपल्याच बच्चे कंपनीला वेध लागतात ते किल्ले बनविण्याच्या कामाचे. अशातच मुलांना



प्रोत्साहन देण्याकरता किल्ले बांधण्याच्या स्पर्धादेखील उरण तालुक्यातील काही सामाजिक मंडळामार्फत घेण्यात येत आहेत. पालकही बच्चे कंपनीला प्रोत्साहन देताना दिसत आहेत. चिरनेर येथील जिज्ञेश प्रफुल्ल घरत, साहिल अंकुश घरत, आयुष गणेश घरत, नितेश रंजित पाटील या बच्चे कंपनीने सिंधुदुर्ग किल्ल्याची प्रतिकृती अगदी उत्तम साकारली आहे. यातून त्यांचा उत्साह द्विगुणित होताना दिसतो.

सध्या रेडिमेड किल्ले सर्वत्र पाहायला मिळत असताना, ग्रामीण भागातील मुले डोंगरातील व शेतातील लाल काळया मातीपासून घराच्या अंगणात किल्ले तयार करताना पहावयास मिळत आहेत. किल्ला तयार झाल्यावर त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती विराजमान केली जाते. त्याचबरोबर पहारेकरी मावळे किल्ल्यावर ठेवले जातात. किल्ला मावळे, सैनिक व रंग यांनी सजवला जातो. त्यावर मोहरी टाकून उगवलेली हिरवळ दाखविली जाते. तसेच पाण्याचे कारंजे व रात्री किल्ल्यावर केलेल्या रोषणाईने किल्ले उजळून निघतात.

दिवाळीमध्ये बच्चे कंपनी आणि युवक युवती देखील निरनिराळे किल्ले, गड, सामाजिक देखावे साकारून कला आणि पारंपारिक संस्कृती जपताना दिसून येत आहेत. रायगड किल्ला, प्रतापगड, सिंधुदुर्ग गड, कर्नाळा अशा प्रसिद्ध किल्ल्यांची प्रतिकृती चिरनेर परिसरातील गावागावात तयार करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक ११६
www.ramprahar.com

# राम प्रहर

रविवार, १२ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

रविप्रहरमध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
दिवाळीनिमित्त गडकिल्ल्यांतून जागवला जातोय इतिहास/५
वर्ल्डकपमध्ये भारताचा आज नेदरलँड्सविरुद्ध सामना/८

## मुंब्र्यात शिवसेना शाखेवरून राडा

### कार्यकर्त्यांनी उद्धव ठाकरेंना दाखवले काळे झेंडे

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथील शिवसेना शाखेवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आणि उद्धव ठाकरे गट यांच्यात शनिवारी (दि. ११) जोरदार राडा झाला. या वेळी घटनास्थळी गेलेल्या उद्धव ठाकरे यांना शिंदे समर्थक कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवून निषेध केला. यानंतर काही वेळाने उद्धव ठाकरे माघारी फिरले.

शिवसेनेतील उठाव आणि राज्यातील सत्तांतरानंतर मुंब्रा येथील शिवसेना शाखा ठाकरे गट आणि शिंदे समर्थक अशी विभागल्या. त्यानंतर शाखा-शाखांवर दोन्ही गटांकडून दावा केला जात आहे. मुंब्र्यातील शाखा पाडून तिथे नवी शाखा बांधल्याचे सांगत या शाखेवरही दावा करण्यात आला.

यानंतर या परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली. उद्धव ठाकरे स्वतः या शाखेला भेट देण्यासाठी आले. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे समर्थक कार्यकर्तेही शाखा परिसरात जमले होते. पोलिसांनी कायदा सुव्यवस्था बिघडू नये म्हणून उद्धव ठाकरेंना पुढे जाऊ दिले नाही. त्यामुळे ते काही वेळ गाडीतच बसून राहिले. त्यानंतर ते बॅरिकेट्सपाशी पोहचले व अखेर माघारी फिरले.

# आर्या आंबेकरच्या सुरेल मैफिलीने पनवेलकर मंत्रमुग्ध






छाया : संकेत भोईर (अधिक छायाचित्रे पान ६वर..)



## दिवाळी पहाट कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद


## प्रभू श्रीराम अन् अयोध्या मंदिर प्रतिकृती आरास विशेष आकर्षण

**पनवेल : हरेश साठे**


दीपावलीचा उदंड उत्साह, प्रभू श्रीराम व अयोध्या मंदिर प्रतिकृतीची शानदार आरास, थंडीचा सुखद गारवा आणि यामध्ये सुप्रसिद्ध गायिका आर्या आंबेकर हिच्या सुरेल गाण्यांच्या मैफिलीने पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे शनिवारी (दि. ११) दिवाळी पहाट कार्यक्रम रंगला. पनवेल महानगरपालिका आयोजित आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेले श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ प्रायोजित या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या सांगीतिक मेजवानीने दीपावलीचा आनंद द्विगुणित झाला.

या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, भाजप मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. सुहास हळदीपूरकर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे सहआयुक्त गणेश शेट्ये, माजी महापौर कविता चौतमोल, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत **(पान २ वर..)**












# अशा 'उडत्या तबकड्या' प्रत्येक काळात असतात नि विझतातही...





झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

एक सोपा प्रश्न विचारतो, उर्फी जावेद म्हटल्यावर तिची भूमिका असलेला एक तरी चित्रपट पटकन डोळ्यासमोर येतो का? (ती चित्रपटात भूमिका साकारते का? का साकारते? हेही उपप्रश्न आहेतच.) एखाद्या मॉलमध्ये ती चक्क समोर आली काय नि गेली काय, तुम्ही ओळखाल? मी नक्कीच नाही. आणि ओळखलं तरी तिच्यासोबत सेल्फी काढावासा वाटेल?

फार नाही आणखी दोन तीन वर्षातच एखाद्या कोड्यामध्ये तुम्हाला आपल्या धाडसी, विचित्र, अनाकलनीय वस्त्ररचना, बेधडक बोलणं, अरेरावी कृत आणि मीडियाचे लक्ष वेधून घेणारी अभिनेत्री कोण असं विचारलं तर कदाचित डोक्याला शॉट नि मेंदूला ताण द्यावा लागेल आणि थोड्या वेळाने कदाचित नाव आठवलेच तर आठवेल उर्फी जावेद. तरी पुन्हा एकदा स्वतःलाच प्रश्न कराल, उर्फी जावेदच होती ना ती?

अशा प्रकारच्या अभिनेत्री....खरं अभिनेत्री का म्हणावं हा प्रश्नच आहे म्हणा... कोणी त्यांना 'उडती तबकडी' म्हणतात. पण प्रत्येक युगामध्ये असतातच. हाही एक फ्लॅशबॅक. सिनेमाचा इतिहास. मनोरंजनाच्या विश्वामध्ये अनेक प्रकारचे लेखक, निर्माता, दिग्दर्शक, वितरक, तंत्रज्ञ, अगदी 'पिक्चर्स दाखवणारी थिएटर्सही' वगैरे वगैरे वगैरे कार्यरत असतात. त्यात हे कल्चर. त्यांना कोणी पीनअप गर्ल्स, 'पानपुरके ' असंही म्हणतात. काहीही म्हटलं तरी फॉर्म्युल्यात आणि फॉरमॅटमध्ये फरक तो नाही. नाव वेगळं असेल इतकंच. तेवढीच ज्ञानात भर.

सगळेच कलाकार हे काही दर्जेदार अभिनय करण्यासाठी ओळखले जातात अथवा जाऊ शकतात असे नाही. ते शक्यही नाही. सर्वच चित्रपट अभिनयाला वाव भाव देणारे असतात असेही नाही. तेही शक्य नाही. काही काही कलाकारांना आपल्या अभिनयाच्या मर्यादा, संवाद फेकीतील दोष, उच्चारातील उणिवा, भावनारहित चेहरा याची पूर्ण जाणीव असते (स्वतःच्या मर्यादा माहित असणे सगळ्यात मोठा चांगला गुण) आणि मग असे कलाकार आपल्याकडे चित्रपटसृष्टी, चित्रपट रसिक, आणि प्रसार माध्यम यांचं लक्ष वेधण्यासाठी सतत सवंगपणाचा मार्ग स्वीकारतात. अर्थात ते आपल्या मर्यादेत राहून अशा प्रकारचा एक वेगळा मार्ग स्वीकारुन आपली वाटचाल करु पाहतात. दोन तीन वर्षातच त्यांचा कारकीर्द उताराला लागते. त्याचीही त्यांना कल्पना असावी. फार पूर्वी त्यांना मीडिया स्टार अथवा 'टाईमपास आर्टिस्ट म्हणायचे. या वर्गात उत्तीर्ण झालेल्या अभिनेत्रींची तुम्हाला मी नाव सांगितली तर कदाचित आश्चर्य वाटेल. या नावाच्या अभिनेत्री कधी काळी हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये खरंच कार्यरत होत्या का असा कोड्यात पडणारा प्रश्न तुम्हाला पडू शकतो. तुम्ही लगेचच गुगलवर जाऊन त्यांचा शोध घ्यायला सुरुवात कराल. तेवढाच एक पुरावा सापडेल. शामली, शीतल, पद्मिनी कपिला, के. टी. मिर्झा, कोमिला विर्क, रिंकू जयस्वाल अशी भली मोठी 'हिट लिस्ट' आहे आणि या अभिनेत्रींने प्रामुख्याने काय केलं तर गॉसिप्स मॅगझिनमधलं सेंट्रल स्प्रेड अथवा त्यातील बोल्ड फोटोसेशन यांना प्राधान्य दिलं. बिकीनी कॅलेंडरमधून दिसत राहिल्या. आपल्या आकर्षक शरीरसौष्ठवाचं 'शक्य तितकं नि तसं उघडं दर्शन प्रदर्शन घडवलं'. त्याची जणू हौस मौज. सवय. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल मिडियात हे सगळचं 'झिरपलयं' म्हणे. 'कॉमन' झाले आहे. ओटीटीवरील वेबसिरिजमध्ये अनसेन्सॉर्ड अनकट फंडा भारीच आहे म्हणे. इतकेच नव्हे तर, ओटीटीवरील कन्टेनवर महाराष्ट्रीयन अभिनेत्रींनी जरा जास्तच बोल्डपणा दाखवल्याची सोशल मिडियात रंगतदार चर्चा आहे. ते वाह्यात वा सवंग नको. ते थीमनुसार असावे आणि त्यात स्टाईल असेल तर त्याचं कौतुक होईलही. एकेकाळी हेलनच्या ड्रेससेवरून भुवया उंचावल्या जात, पण त्यात आक्षेपार्ह काहीच नसे. आपला फिटनेस, लूक यात तिचा पाश्चात्य कल्चरचा ड्रेस सेन्स छान आकर्षक दिसे. तेच महत्वाचे आहे.

सुरुवातीच्या काळातील रेखा म्हणजे पटाकाच. बोल्ड फोटो सेशन आणि बेधडक मुलाखती म्हणजे रेखा हे घट्ट नाते होते. आंबटशौकीनांना भारीच पर्वणी होती. वाटलं होतं, याच 'गरम मसाला' वैशिष्ट्यात रेखा अडकणार. त्यातून ती अशी नि इतकी बाहेर पडलीय की पन्नासपेक्षा जास्त वर्षांची करिअर असूनही ती आजही कुठेही गेली अथवा असली तरी 'केन्द्रस्थानी' असते. तिला ते सुखावणारे आहे. आपल्या अभिनयातील वाढ तिच्या कर्तृत्वाची उत्तम वाढ ठरलीय. टिचून टिकून राह्यचं तर गुणवत्ता हवीच हवी. नुसतेच अंग नको तर अभिनयाचे अंग हवे.

झीनत अमान, परवीन बाबी यांनीही 'पाश्चात्य स्टाईल मे रहेनेका फंडा' आपल्या पर्सनॅलिटीचा महत्वाचा भाग मानले. त्यांनीही बोल्ड लूक भूमिका व फोटो सेशन केली. पण सवंग झाल्या नाहीत. सत्तरच्या दशकात गॉसिप्स मॅगझिनचा हुकमी फंडा होता, बोल्ड फोटोसेशन आणि बेधडक मुलाखती, त्यांची सणसणीत हेडिंग्ज आणि त्यासाठी लागणारा कच्चामाल किंवा साठा जाहीरा, आशा सचदेव, फरियाल अशा 'स्फोटक' अभिनेत्रींकडून वेळोवेळी मिळत गेला.

दरम्यान, इंग्लिशमधलं हे मटेरियल काही दिवसांतच अन्यभाषिक मिडियात पाझरत गेलं तरी त्याच्यावर टीकेचे प्रहार होत. ही अमेरिका नाही, हे युरोप नाही. ही आपली संस्कृती नाही. असे सल्ले दिले जात. नव्वदच्या दशकात ममता कुलकर्णीनचे टॉपलेस फोटो सेशन, पूजा भट्टची बॉडी रंगसंगती याचा भारीच कल्चरल धक्का बसला. मिडियात केवढा ओरडा झाला. काही वृत्तपत्रातून वाचकांची पत्रे, अग्रलेख लिहिले गेले. थीमनुसार बोल्ड दृश्य समजू शकतो. ती सेन्सॉरच्या कात्रीतून सुटलीत. गॉसिप्स मॅगझिनचं तसं नाही. त्यांना विक्री मूल्य महत्वाचे. वाचण्यासारखे काही नसेल तर 'दाखवण्यासारखं' काही असावं असा दृष्टीकोन आता होते. आणि एकदा 'पब्लिक फिगर' झाल्यावर उलटसुलट टीका स्वीकारायची मानसिकता ठेवावी लागतेच.

तरीसुद्धा कधी चक्क आश्चर्याचे धक्के बसतात. अलिखित नियमालाही अपवाद असू शकतो. शीतल नावाच्या अभिनेत्रीला ऋषिकेश मुखर्जी दिग्दर्शित बेमिसालमध्ये अमिताभ बच्चन बरोबर काही चांगले नाट्यमय प्रसंग साकारायला मिळाले. इतकंच नव्हे तर शीतलने निर्माण केलेल्या हनी नावाच्या चित्रपटाची चक्क राज कपूरने तारीफ केली. राज कपूरचे प्रमाणपत्र एकाद्या पुरस्काराइतकचं महत्वाचे. राज कपूरनेच रिना रॉयला त्या काळातील सर्वात मोहक अभिनेत्री असे प्रमाणपत्र दिले आणि रिना रॉयच्या चाहत्यांत वाढ झाली.

असे आश्चर्याचे धक्के पचवणं आहे सोपं नाहीये. आशा सचदेवने बासू चटर्जी दिग्दर्शित प्रियतमा मध्ये आपल्या वाटेला आलेली भूमिका अतिशय उत्तमपणे साकारत समीक्षक आणि प्रेक्षकांची दाद मिळवली. असं अधूनमधून घडतच असते. घडायलाच हवे. तरी त्यांची मुख्य ओळख ग्लॉसी पेपरवरील आपल्या शरीर सौंदर्याचं नवीन फॅशनच्या वस्त्रांमधून दर्शन प्रदर्शन घडवून सनसनाटी निर्माण करणं हेच असतं. तीच परंपरा अनिता अयूबपासून शरलीन चोप्रापर्यंत अनेकींनी सुरु ठेवली. काय करणार? तेच येत होतं. ऐवीतेवी सी ग्रेड पिक्चर्सही पडद्यावर येत असतात. व्हिडिओ थिएटरमधून पाहिले जात असतात. त्यांना प्रतिष्ठा जरी नसली तरी प्रसिद्धी मात्र आहे. सोशल मीडियाच्या काळामध्ये तर अशा पद्धतीचं ढिंच्याक फोटोसेशन आणि बेधडक व्यक्तव्य यांना मोठाच प्लॅटफॉर्म उपलब्ध झाला आहे. आपणच आपले फोटो काढायचे आणि ते सोशल मीडियामध्ये पोस्ट करायचे. मिताली मयेकरही बिकीनीतील फोटो सोशल मिडियात पोस्ट करते आणि ट्रोलर्सना उत्तरही देते. मराठीतील स्मिता गोंदकर, सई ताम्हणकर, छोटी सोनाली कुलकर्णी यांनीही बिकीनीत पडद्यावर वा सोशल मिडियात दर्शन घडवले. त्यावर उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या, पण त्यात आकर्षकता होती. प्रार्थना बेहेरेचे स्वीमिंग पूलावरचे बेदिंग सूटातील फोटोसेशन ब्युटीफुल याच शब्दात कौतुक करण्यासारखं.

दुसरीकडे पाहिलं न पाहिलं तरी सोशल मिडियाच्या काळात उर्फी जावेद पठडीतल्या चेहऱ्यांची वाढ झाली आहे आणि त्यांना कुठे हो चित्रपट माध्यम व व्यवसायाविषयी फार काही देणं घेणं आहे? त्यांना तेवढापुरता एक टाईमपास नि झटपट प्रसिद्धी हवी. त्यांना पेज थ्री पार्ट्यांतून 'आईस कॅन्डी' (लक्ष वेधून घेणाऱ्या अशा अर्थाने) म्हणून फिरायचेय. रेड कार्पेटवर त्यांना लक्ष वेधून घ्यायचयं. इतकंच नव्हे तर आता विमानतळावरच्या फोटो सेशनमध्ये सुद्धा अशा प्रकारच्या काही अभिनेत्री आपला जलवा दाखवतात.. त्यातील एक्सपोजर आणि फोकस यांचा जो संगम आहे त्याच्यासाठी अतिशय पूरक असं वातावरण आहे. अनेकांची नावे लक्षात येण्यापूर्वीच विसरली जाण्याची सवय झालीय.

उर्फीसारख्या सवंग आणि बेधडक, उथळ युवतींचे आज फावलयं. आज प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टीची बातमी होतेय. पीआर टीम त्यासाठी तत्पर आहे. असं असूनही एकदा घात झालाच. एका इव्हेन्टसमध्ये दीपिका पदुकोण एका फॅशनेबल रुपात गेली आणि नेमक्या त्यावरून ट्रोल झाली. ती तिला तिच्या पीआर टीमने टीप्स दिली होती म्हणे. हे सेलिब्रिटीजच्या आजूबाजूचे देत असलेले सल्ले खरंच उपयुक्त आहेत ना याचाही विचार करावा. एका विषयाला फाटे तरी किती फुटताहेत बघा.

आज अभिनयापेक्षा दिसण्याला जास्त महत्व आलयं. सांस्कृतिक क्षेत्रातील मोकळ्या ढाकळ्या वातावरणाचाही परिणाम असावा.. आजच्या चित्रपटांमध्ये भूमिका करायची म्हणजे आता मधुबाला, नर्गिस, मीनाकुमारी वैजयंतीमाला, वहिदा रेहमान, तनुजा, नूतन, आशा पारेख, सायरा बानू, माला सिन्हा यांचा काळ राहिलेला नसला अथवा हेमा मालिनी, रेखा, राखी, जया भादुरी, नीतू सिंग, पद्मिनी कोल्हापूरे, पूनम थिल्लॉन, शबाना आझमी, स्मिता पाटील यांचं युग नसले, श्रीदेवी, जयाप्रदा, डिंपल कापडिया, माधुरी दीक्षित, मीनाक्षी शेषाद्री, जूही चावला, मनिषा कोईराला, रति अग्निहोत्री यांचा काळ सुद्धा मागे पडला असेल, परंतु या अभिनेत्रींनी आपला अभिनय, नृत्य, सौंदर्य आणि अनेक प्रकारच्या अनुभवातून येत गेलेली परिपक्वता आणि या सगळ्यातून आलेलं सामाजिक, सांस्कृतिक, माध्यम यांचं भान यातून जे आपलं स्थान निर्माण केलं आणि टिकवलं याला दाद द्यायलाच हवी. चित्रपटांमध्ये काम भूमिका करायची म्हणजे फक्त सौंदर्याचं नाणं उपयुक्त नसते. 'छान दिसलो, छान हसलो, छान सजलो' झालो आपण अभिनेत्री असं आणि इतकं सोपं समीकरण आहे का? अभिनय व नृत्याचे प्रशिक्षणही महत्वाचे आणि काम करता करता अभिनयात परिपक्वताही महत्त्वाची.

गुणवत्तेशिवाय कोणीही कोणत्याच कुठल्याही क्षेत्रांत आपलं अस्तित्व निर्माण करू शकत नाही. नाणं चलनी करू शकत नाहीत, परंतु ती अवघड वाट स्वीकारण्यापेक्षा शॉर्टकटने जर प्रसिद्धी मिळणार असेल नि फोकसमध्ये राहता येत असेल तर त्यासाठी शॉर्ट कपडे आणि स्फोटक बोलणं ही आयुध अथवा शस्त्रे उपयोगी पडत असतील तर त्याचा आपण वापर करावा अशा मानसिकतेचासुद्धा एक वर्ग या मनोरंजन क्षेत्रांमध्ये कालही होता, आजही आहे आणि यापुढे देखील राहील. अर्थात बिकिनी परिधान करणं याकडे नेहमीच वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिलं गेलं आहे. दिल्ली का ढगसाठी नूतनने बेदिंग सूट परिणाम केला त्यावेळी तो एक सांस्कृतिक धक्का मानला गेला. कारण आपल्या बोलक्या डोळ्यांनी आणि भावमुद्रांनी अभिनयाचा वेगळा अविष्कार साकारणाऱ्या नूतनला अशा पद्धतीने बेदिंग सीट परिधान करण्याची का आवश्यकता भासली असा एक रोखठोक सवाल होता, परंतु थीम आणि प्रसंगाची गरज म्हणून आपण अशा वस्त्राला पसंती दिली याकडे नूतनने लक्ष वेधून घेतले. शर्मिला टागोरने अशाच बेदींग सुटामध्ये एका ख्यातनाम चित्रपट मासिकाच्या कव्हरवर दर्शन घडवलं तेव्हाही फार मोठी खळबळ उडाली, परंतु ते फोटोसेशन म्हणजेच आपण नव्हे तर आपण सत्यकाम, आराधना, 'अमर प्रेम सारख्या चित्रपटांमधून पुन्हा पारंपारिक स्त्रीची भूमिका साकारुन एक आदर्श निर्माण करू शकतो हे शर्मिला टागोरने सिद्ध केलं. शक्ती सामंता दिग्दर्शित 'न इव्हिनिंग इन पॅरीस'च्या पूर्वप्रसिध्दीचा फंडा म्हणूनही तो ग्लॅमरस फोटो सेशनचा तडका होता. फारच चघळला गेला हो.

सत्तरच्या दशकात अभिनय येत असणाऱ्या अभिनेत्री एका एका बाजूला आणि ग्लॅमरला महत्त्व असणाऱ्या अभिनेत्री दुसऱ्या बाजूला असे दोन ट्रॅक एकाच वेळी सुरु झाले. जया भादुरी हे पहिल्या प्रकारातील अभिनेत्री म्हणून घडत गेली. मग शबाना आजमी, स्मिता पाटील, दीप्ती नवल यांनी समांतर चित्रपटाची वाटचाल पुढे चालू ठेवली आणि दुसऱ्या बाजूला बघितलं तर रीना रॉय, पुनम थिल्लॉन अशा ग्लॅमरस अभिनेत्रींनी त्या काळात उत्तम वाटचाल केली. नंतरच्या काळात एका बाजूला तब्बूने पारंपारिक भूमिकांकडे लक्ष दिलं. कंगना राणावतने ह्या दोन्हीचा समतोल राखला.. हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्रींच्या परंपरेचा वेध घेताना असे बरेच संदर्भ आणि वैशिष्ट्य सांगता येतील आणि त्यामधला एक फंडा होता शॉर्टकटने यश मिळवण्याचा प्रयत्न करणे. कलेच्या क्षेत्रात शॉट कर्ट नसतात हे त्यांना कोणीतरी सांगा हो. अल्पकाळासाठी का होईना फोकस मध्ये राहणं म्हणजे जणू ट्वेंटी-ट्वेंटी क्रिकेटच्या काळात असल्यासारखं झटपट सवंग प्रसिद्धी मिळवणं आणि ते मिळवताना दुर्दैवाने वस्त्रांचा आणि भाषेचे भान नसणं. एक्सप्रेशन तर नसणेच. नाहक वाद घालणं आणि ह्या सगळ्यातून मिळणारी सणसणीत प्रसिद्धी म्हणजेच आपलं करियर आहे, आपलं अस्तित्व आहे, आपली प्रसिद्धी आहे असं मानणं हे अनेक वर्ष होत आलेलेच आहे. अशा प्रकारच्या अभिनेत्री कालांतराने कालबाह्य कधी होतात हेही समजत नाही. पडद्यावर दिसेनाशा होतात. इव्हेन्टसमधूनही गायब होतात. त्या नेमक्या कुठे जातात, कुठे असतात हे समजत नाही आणि अनेक वर्षांनी अशा एखाद्या अभिनेत्रीच्या कमबॅकची बातमी येते, परंतु त्याबद्दल कोणत्याही प्रकारची सकारात्मक प्रतिक्रिया उमटत नाही वस्तुस्थिती आहे मंदाकिनीला आपण अलीकडे एका कॉमेडी रियालिटी शोमध्ये पाहिलं. त्यावेळेला आपल्याला असं अजिबात वाटलं नाही की ही पुन्हा चित्रपटांमध्ये येऊन आपला काही प्रभाव दाखवेल. ही आपली एक निराशाजनक प्रतिक्रिया आहे अथवा आपल्याला अशा अभिनेत्रीबद्दल कुठलाही प्रकारची सत्कारात्मक भावना आपल्या मनात येत नाही याच्यातच बरंच काही आलं.

राज कपूरने राम तेरी गंगा मैली मध्ये (१९८५) मंदाकिनीला 'गंगा' म्हणून साकारताना राज कपूरचा आपला स्वतःचा एक दिग्दर्शनीय स्पर्श नि दृष्टी होती. त्यामुळे मंदाकिनी त्या एका चित्रपटापुरती आपल्याला लक्षात राहिली. त्या व्यतिरिक्त मंदाकिनी आपलं करिअर घडवणं शक्यच नव्हतं. अशा प्रकारच्या अनेक मंदाकिनी कधी ममता कुलकर्णी नावाने तर कधी उर्फी जावेद नावाने आपल्यासमोर ये जा करत असतात. त्यांच्यात लक्षात ठेवण्यासारखं असे कोणतेही गुण नसतात. भावमुद्रा नसते. फोटोची पोझ नसते किंवा बोलण्यामध्ये एक कुठलाही प्रकारचे गांभीर्य नसतं. अशा टाईमपास मुलींची चित्रपटसृष्टीला अधून मधून गरज असते असे म्हणायला हरकत नाही. कारण ए टू झेड प्रकारचे चित्रपट आपल्याकडे निर्माण होत असतात.

एखाद्या चित्रपटामध्ये अशा प्रकारची एखाद्या अभिनेत्रीची गरज लागतेच म्हणा. या चौकटीमध्ये अडकून किंवा हरकून आपलं करिअर संपवण्यापेक्षा त्यातून बाहेर पडून ज्यांना आपली पुढची वाटचाल करणे शक्य झालं असे एखाद्या रेखाबद्दल आपल्याला नेहमीच कौतुक वाटले. असं उदाहरण एकादेच. म्हणून महत्वाचे आणि ते एक उदाहरण इतरांना प्रेरणा देणार ठरू शकते एवढेच आपण सांगू शकतो. प्रत्यक्षात अशा प्रकारच्या अभिनेत्रींचा मीडिया स्टार बनण्यापलीकडे काही हेतू नसतो. ही मात्र मोठी रियालिटी आहे. हा एक मोठा शो आहे आणि शो बिजनेसमध्ये अशा प्रकारचं फंडे हे होतच राहणार. ते आपण पाहायचे नि विसरायचे. सोडून द्यायचे हे नक्कीच. आणखीन काही दिवसांनी उर्फी जावेद हे नाव जरी आठवलं तरी तो तिचा एक प्रकारचा विजय ठरले एवढं नक्कीच. तसं नक्कीच होणार नाही याचा पुरेपूर विश्वास आहे हो. तेवढे आपण सुज्ञ नक्कीच आहोत.



## झगमगत्या दिव्यांचा सण दिवाळी

दिवाळी हा हिंदू लोकांचा मोठा आवडीचा आणि महत्त्वाचा सण आहे. तसे तर आपल्या हिंदू धर्मात बरेच सण साजरे केले जातात, पण दिवाळी हा सर्वांत मोठा सण मानला जातो.

हा सण आश्विन अमावास्येला साजरा केला जातो. दिवाळीचा सण हा सहा दिवसांचा सण आहे. हा सण वसुबारस पासून सुरू होऊन भाऊबीज पर्यंत साजरा केला जातो. या सणामध्ये वसु-बारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मी-पूजन, पाडवा आणि भाऊबीज हे महत्त्वाचे दिवस असतात. दिवाळीचा सण प्रामुख्याने उत्साह आणि आनंदात साजरा केला जातो.

दसऱ्याच्या २० दिवसानंतर दिवाळी येते. या दिवशी भगवान श्रीराम पत्नी सीता आणि भाऊ लक्ष्मणासह चौदा वर्षाचा वनवास संपवून अयोध्येला परतले होते. त्यांनी लंकेवर विजय मिळवून रावणाचे वध केले त्याच्या प्रीत्यर्थ हा विजयोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. त्या वेळी लोकांनी आपल्या घरात दिवे लावून हा विजयोत्सव साजरा केला होता. त्यामुळे या दिवशी घरा-घरात दिवे लावतात. दिवाळी वासू बारसे पासून सुरु होते आणि भाऊबीजे पर्यंत असते. ६ दिवसांचा हा सण आल्हाददायक आणि उजळून नेणारा सण आहे. चला तर मग दिवाळीच्या ६ दिवसाच्या सणांबद्दल माहिती

वसु बारस -दिवाळीच्या सणाचा पहिला दिवस वसु -बारसेचा असतो. या दिवशी गाय आणि त्याच्या वासराची पूजा केली जाते. बायका उपवास धरतात आणि संध्याकाळी गाय आणि वासराची पूजा करूनच उपवास सोडतात.

धनत्रयोदशी-दुसरा दिवस असतो धन तेरस किंवा धनत्रयोदशीच्या. कृष्ण पक्षाच्या त्रयोदशीला धनतेरस साजरा करतात. या दिवशी खरेदी करणं शुभ मानतात. व्यापारी वर्ग या दिवशी आपल्या व्यवसायाची नवी पुस्तके बनवतात आणि त्याची पूजा करतात.

नरक चतुर्दशी-आश्विन कृष्ण पक्षाची चतुर्दशी नरक चतुर्दशी म्हणून साजरी करतात. या दिवशी अभ्यंग स्नानाचे महत्त्व आहे. या दिवशी सुवासिक तेल लावून उटण्याने स्नान करतात. यमासाठी दीपदान करतात. या दिवशी गव्हाच्या पिठाचे दिवे तयार करतात आणि घरातील पुरुष मंडळींना स्नान करताना दिवे ओवाळतात.

लक्ष्मी-पूजन-आश्विन अमावास्येला संध्याकाळी ही पूजा केली जाते. या दिवशी लक्ष्मी देवी सर्वीकडे संचारते. स्वच्छ, योग्य असे स्थळ ती आपल्या वास्तव्यास शोधते. या दिवशी रात्री श्री गणेश, लक्ष्मी देवी आणि देवी सरस्वतीची पूजा करतात. या दिवशी नाणी, सोनं, चांदीची पूजा देखील करतात. रात्री फटाके उडवतात.

पाडवा-दिवाळीचा पुढचा दिवस म्हणजे कार्तिक शुद्ध प्रतिपदेला बळी प्रतिपदा किंवा पाडवा असे ही म्हणतात. हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त मानला गेला आहे. या दिवशी घरातील स्त्रिया आपल्या वडीलधारी कर्ता पुरुषाचे औक्षण करतात. स्त्रिया आपल्या नवऱ्याला वडिलांना, सासऱ्यांना औक्षण करतात. नवरा, वडील, सासरे तिला काही भेट वस्तू देतात.

भाऊबीज-दिवाळीची सांगता भाऊबीजेच्या सणा नंतर होते. हा सण खास भाऊ-बहिणीचा आहे. कार्तिक शुद्ध द्वितीयेला ज्याला यम द्वितीया असे ही म्हणतात हा सण साजरा करतात. बहिणी या दिवशी भावाला बोलवून किंवा त्याचा कडे जाऊन गोड धोडाचे जेवण करतात. संध्याकाळी चंद्राची कोर बघून बहीण आधी चंद्राला नंतर भावाला ओवाळते. भाऊ बहिणीला ओवाळणी देतो. या मागील शास्त्र असे की भाऊ चिरंजीव व्हावा आणि त्याची प्रगती व्हावी. भाऊ आपल्या बहिणीला यथाशक्ती भेटवस्तू देतो. ज्या बहिणींना भाऊ नसतो त्या चंद्राला ओवाळतात. अश्या प्रकारे हा दिवाळीचा सण आनंदाने आणि उत्साहाने साजरा करण्याची पद्धत आहे.

**(साभार : मराठी वेबदुनिया)**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# मुरुडमध्ये पर्यटन हंगामासाठी व्यावसायिक झाले सज्ज!



**मुरुड : प्रतिनिधी**

दिवाळी सुट्टी ९ ते २५ नोव्हेंबरपर्यंत आहे. त्यामुळे या सुट्टीत पर्यटक मोठ्या संख्येने मुरूडला भेट देतात. दिवाळीचा सण असल्याने पर्यटकांची संख्या कमी आहे, मात्र भाऊबिजेनंतर येथे पर्यटकांची गर्दी होण्यास सुरुवात होणार असून सर्व हॉटेल, लॉजिंग व्यावसायिक सज्ज झाले असल्याचे व्यावसायिकांनी सांगितले.

सध्या मुरूडमध्ये काही प्रमाणात थंडी जाणवण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे गेल्या काही शनिवार, रविवारी पर्यटक तुरळक प्रमाणात येण्यास सुरुवात झाली आहे. हिवाळ्याच्या हंगामात मुरूडला लाखोंच्या संख्येने पर्यटक भेट देतात. त्यामुळे येथील पर्यटन व्यवसायालाही चालना मिळते. हिवाळी हंगामात मुरूडमध्ये विविध महोत्सवांचा आस्वादही पर्यटकांना घेता येतो.

सध्या दिपावलीचा सण सुरू असून सर्वत्रच हा सण उत्साहात साजरा केला जातो. त्यामुळे दिवाळीदरम्यान जरी पर्यटकांची संख्या कमी असली तरीदेखील भाऊबीज संपताच, मुरूड समुद्रकिनारा पर्यटकांनी फुललेला असेल असा विश्वास व्यावसायिकांनी व्यक्त केला आहे. याबाबत लॉज मालकांना विचारले असता त्यांनी सांगितले, सध्या पर्यटक फार कमी असले तरी पुढे ते वाढणार आहेत. १७ ते २२ नोव्हेंबरपर्यंत सर्व लॉजची बुकिंग हाउसफुल झाली आहे.

पर्यटकांनी रूम बुक केल्या आहेत. त्यामुळे या काळात पर्यटकांची मोठी गर्दी राहणार आहे. सध्या पर्यटक फार कमी दिसत आहे. येणारा आगामी काळ हा पर्यटकांचा असणार आहे.

## माथेरान पर्यटकांसाठी सजले




**माथेरान : रामप्रहर वृत्त**

या विकेंडपासून दिवाळी पर्यटन हंगामाला सुरुवात होत असून माथेरान हे पर्यटकांच्या स्वागताची जय्यत तयारी करून सजलेले दिसत आहे. येथील व्यावसायिकांकडून पर्यटक हंगामाची तयारी पूर्ण झाली असून सगळेच माथेरानवासीय पर्यटकांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहेत. अवकाळी पावसामुळे येथील वातावरणात कमालीचा गारवा निर्माण झाला आहे. येणाऱ्या पर्यटकांना गारेगार माथेरान अनुभवता येणार आहे.

दिवाळी हंगामात पर्यटकदेखील हळूहळू माथेरानमध्ये दाखल होत आहेत. सर्व शाळा, कॉलेजना आत्ता सुट्ट्या असून पुढील १५ ते २० दिवसांच्या दिवाळी हंगामासाठी पर्यटक माथेरानमध्ये दाखल होणार आहेत. या दिवाळी हंगामात येणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी येथील हॉटेल्स, लॉजिंग आणि खाद्यगृहे यांनी मोठे मोठे आकाशकंदील आणि विद्युत रोषणाई केली आहे.पर्यटकांसाठी येथील हॉटेल्स, लॉजिंग, खाद्यगृहेही पूर्ण सजावटीने उत्तमसेवा पुरविण्यासाठी सजलेली दिसत आहेत. माथेरान रेल्वे प्रशासनाकडूनदेखील नेरळ–माथेरान मिनिट्रेन सेवा नुकतीच सुरू करण्यात आली आहे, तसेच येथे माथेरान–अमन लॉज शटल सेवादेखील सुरळीत सुरू आहे. येणाऱ्या पर्यटकांना गारेगार वातावरणात पर्यटनाची मजा लुटता येणार आहे.


**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६

**माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत फटाक्यांबाबत जाहीर आवाहन**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, मा. मुंबई उच्च न्यायालयाने PIL NO. ३/२०२३ अन्वये MMR क्षेत्रातील हवेची गुणवत्ता AQI (air quality index) बाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हवेची गुणवत्ता सुधारणे कामी विविध उपाय योजना आणि जनजागृती उपक्रम पनवेल महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहेत.

तसेच सर्वांना माहितीच आहे की, आपण वैश्विक वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे महत्वाचे कारण आहे. विविध सण / उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यामध्ये कार्बन डायऑक्साईड व सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायुचे उत्सर्जन करतात, या उत्सर्जनामुळे पृथ्वीवरील तापमानात वाढ होत असून हे वायु वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच सर्व मानवी प्रजातीस हानी पोहोचवतात. हवेचे प्रदूषण थांबवण्याची क्रिया आपण स्वतः पासून सुरु करु शकतो. महाराष्ट्र शासनाने निर्देश दिल्याप्रमाणे माझी वसुंधरा अभियान ४.० अभियानांतर्गत फटाकेमुक्त, कचरामुक्त, प्रदूषणमुक्त, व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टिवल, सण उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करूयात. तरी सर्व नागरीकांना दिपावली कालावधीमध्ये फट्याकांचा वापर शक्यतो टाळावा. तथापि, फटाके फोडणाऱ्यांनी केवळ सायं. ८ ते रात्री १० या कालावधीमध्येच फोडावेत असे मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या अनुषंगाने जाहीर आवाहन करण्यात येत आहे. पनवेल महानगरपालिकेने नागरिकांच्या सेवेसाठी व हवा प्रदुषण विषयी कोणत्याही माहितीसाठी ८१०८१०१९९७ हा तातडीचा सेवा क्रमांक सुरू केला आहे. त्याच प्रमाणे नागरिक पनवेल महानगरपालिकेच्या (०२२–२७४५ ८०४०) या क्रमांकावर संपर्क करू शकता.

**सही/–**
**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका**


## परतीच्या पावसामुळे मुरूड पंचक्रोशीत भातशेतीचे मोठे नुकसान



**मुरूड : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाने मुरुड पंचक्रोशी भागात मोठ्या प्रमाणात भातशेतीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्यात यावे व संबंधित शेतकऱ्यांना ताबडतोब भरपाई मिळावी, अशी मागणी होत आहे.

मुरुड पंचक्रोशी भागात भातपीकाची मोठी लागवड केली जाते. याच भातशेतीच्या उत्पन्नावर इथला शेतकराचा उदरनिर्वाह चालतो. चार महिने अथक परिश्रम घेऊन बळीराजाला भाताचा दाणा पहावयास मिळाला होता. यामुळे शेतकरी आनंदित होऊन भातकापणी व झोडणीच्या कामाला सुरुवात करुन भाताच्या मळण्या करुन शेतातच ठेवण्यात आल्या होत्या, मात्र परतीच्या पावसाने पीक पाण्याखाली जाऊन आलेला सोन्याचा दाणा पाण्याखाली आल्याने शेतकऱ्यांच्या भातशेतीचे नुकसान झाले आहे. महसूल विभाग व कृषी विभागामार्फत तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना भरपाई मिळावी, अशी मागणी होत आहे.

## तळाशेतमध्ये ५५ दुकानांतर्गत धान्यकीट वाटप



**माणगाव : प्रतिनिधी**

दीपावली सणानिमित्त शासनाकडून येणाऱ्या आनंदाच्या शिधा कीट लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी तालुका पुरवठा विभागाने नेटके नियोजन केले आहे.

तळाशेत ५५ या दुकानांतर्गत येणाऱ्या कशेणे गावात शनिवारी (दि. ११) तालुका पुरवठा अधिकारी संजय माने यांच्या हस्ते कशेणे गावातील लाभार्थींना आनंदाचा शिधा कीट वाटप करण्यात आले. त्यामुळे कशेणे गावातील नागरिकांची दिवाळी अधिकच गोड झाली. या वेळी ज्येष्ठ नेते व सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष शेखर देशमुख, तालुका पुरवठा सहाय्यक अधिकारी वंदना बागुल, परमेश्वर खरोडे आदी उपस्थित होते. माणगाव तालुक्यात ३२ हजार लाभार्थी असून या सर्व लाभार्थांना शासनातर्फे दीपावली सणानिमित्त शासनाकडून आनंदाचा शिधा कीट मिळणार आहे. या एका कीटाचे मूल्य १०० रुपये देऊन लाभार्थांना मिळणार आहे. यात एक किलो साखर, एक किलो तेल, अर्धा किलो चणाडाळ, अर्धा किलो रवा, अर्धा किलो मैदा, अर्धा किलो पोहे असे सहा शिधा जिन्नस संच यात असणार आहे.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्री. संतोष विश्वनाथ लोखंडे २) श्री. राहूल गोपाळ राव यांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. अमोद पुरषोत्तम दाते यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कसळखंड, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार |
|---|---|---|---|
| ३७ | २ | एकूण क्षेत्र ०–३०–९० **पैकी** ०–११–०० | ७.०० **पैकी** २.४६ |
| ४१ | १/ब | एकूण क्षेत्र ०–३७–३० **पैकी ०–२२–००** | ७.६२ **पैकी ५.०४** |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस फरोक्त वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत,तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**ठिकाण : पनवेल,**
**दिनांक: १०/११/२०२३**

**सही /–**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**मो नं ८१०८५५८२८९**

पत्ता:– शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपींग कॉम्पलेक्स, पहिला मजला, भाजी मार्केट जवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६


## पनवेल आणि नांदेडदरम्यान अतिरिक्त उत्सव विशेष रेल्वेगाडी

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे दिवाळी, छठ सणादरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन पनवेल (मुंबई) आणि हजूर साहिब नांदेड दरम्यान चार अतिरिक्त उत्सव विशेष रेल्वेगाडी चालविण्यात येणार आहे.

या विशेष गाड्यांमध्ये उत्सव विशेष १८ नोव्हेंबर रोजी पनवेल येथून १.२० वाजता सुटेल (दोन फेऱ्या) आणि हजूर साहिब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी ४ वाजता पोहचेल. १७ नोव्हेंबर रोजी (दोन फेऱ्या) हजूर साहिब नांदेड येथून ११ वाजता सुटेल आणि पनवेल येथे दुसऱ्या दिवशी १२.२० वाजता पोहाचेल. या गाडीसाठी कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, नगरसोल, औरंगाबाद, जालना, परतूर, सेलू, परभणी आणि पूर्णा हे थांबे देण्यात आले आहे. या गाडीत २० डब्बे रचना एक तृतीय वातानुकूलित, ११ शयनयान, आठ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड्स ब्रेक व्हॅन अशी आहे.

या गाडीचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर बुकिंग आधीच सुरू आहे. तपशीलवार वेळ आणि थांब्यासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.inला भेट द्या देण्याचे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

## पतसंस्थांनी विश्वासार्हता जोपासावी –अमित ओझे

**मुरूड : प्रतिनिधी**

ठेवीदार आणि कर्जदार ही रथाची दोन चाके असून ठेवीदार हा पतसंस्थेचा कणा आहे. बँकांपेक्षा अधिक व्याज पतसंस्था देतात आणि आर्थिक गणित नीट बसावे यासाठी ठेवीदार पतसंस्थांमध्ये कष्टाचा पैसा गुंतवितात. ठेवीदारांचा विश्वास कायम राहिला पाहिजे या उद्देशाने पतसंस्थांनी व्यवहारात पारदर्शकता आणून विश्वासार्हता जोपासावी, असे आवाहन केशवस्मृती पतसंस्थेचे अध्यक्ष अमित ओझे यांनी केले.

जयश्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे नांदगाव शाखेच्या २१व्या वर्धापन दिनी आयोजित सभासद मेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.




या वेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी, उपाध्यक्ष मेघराज जाधव, नांदगाव सरपंच सेजल घुमकर, सहकारभारतीचे जिल्हा संघटक दिलीप पटेल, नांदगाव शाखा समिती सदस्य पांडुरंग निरकर, कोषाध्यक्ष बा. वि. कासार, सचिव सुनील विरकुड, संचालक डॉ. संजय पाटील, सिद्धश गद्रे, ॲड. संजय जोशी, सरव्यवस्थापक संजय ठाकूर आदी उपस्थित होते.

## आनंदाचा शिधा वेळेत मिळाल्याने लाभार्थ्यांमध्ये समाधान

**माथेरान** : राज्य शासनाकडून पूर्ण महाराष्ट्रात आनंदाचा शिधा वाटप केला जात आहे. त्यामुळे शिधाधारक समाधान व्यक्त करीत आहेत.

माथेरानमध्ये एकूण ८५० शिधाधारक असून शासनाकडून मिळत असलेल्या शिधा पत्रिकेवरील धान्याचा लाभ घेत आहेत. राज्य शासनाने आनंदाचा शिधा हा दिवाळी सणापूर्वी देऊन दीपावलीच्या भेट सर्वसामान्य नागरिकांना दिली आहे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये ही भेट दिल्यामुळे त्यांची दिवाळी गोड झाली आहे. आनंदाच्या शिधामध्ये साखर आणि तेल प्रत्येकी एक एक किलो तर रवा, मैदा, पोहे, चणाडाळ प्रत्येकी अर्धा किलो वाटप करण्यात आले.

आनंदाचा शिधा हा दिवाळीपूर्वी वाटप होत असल्याने लाभार्थ्यांनी रास्त भाव धान्य दुकानासमोर एकच गर्दी केली होती.

## दिवाळीनिमित्त गड किल्ल्यांतून जागवला जातोय इतिहास

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

किल्ले म्हंटले की, समोर येतात शिवाजी महाराजांचे अभेद्य व उंचच उंच इतिहासाची साक्ष देणारे किल्ले व गड–कोट. पाठ्यपुस्तके, नाटक, चित्रपट, शाहीरांकडून गायले जाणारे पोवाडे यामुळे ऐतिहासिक वारसा जिवंत ठेवला जात आहे. हाच वारसा तरुणांकडून दरवर्षी दिवाळीत मातीचे किल्ले व गड उभारून जपला जात आहे. रायगड जिल्ह्यामध्येदेखील किल्ल्यांच्या हुबेहूब प्रतिकृती तयार करण्यास सुरुवात झाली आहेत. दिवाळीच्या या सणात गड किल्ले तरुणांचा उत्साह वाढवणारे ठरणार आहेत. यासाठी बच्चे कंपनीसह मोठ्यांचीदेखील साथ मिळू लागली आहे.



सध्या दिवाळीची सुटी सुरू आहे. हल्लीची पिढी ही टेक्नोसॅव्ही असल्याने मोबाईल, टीव्ही, संगणकाकडे वळलेली दिसून येत आहे. मैदानी खेळ त्यातून होणारा मातीचा स्पर्श कधीच मागे पडलेला असताना ऐतिहासिक किल्ल्यांमुळे मात्र तरुण मुले व बच्चे कंपनी मातीत घुटमळू लागली आहे. किल्ले तयार करण्यासठी दिवाळीच्या आधी सात ते आठ दिवस तयारी सुरू केली जाते. सध्या पारंपरिक आवड जपण्यासाठी आधुनिक साधनांचा उपयोग केला जात आहे. गुगलवरून किल्ल्यांची माहिती, नकाशे घेऊन त्याचा आराखडा तयार करण्यात येत आहे. त्याआधी बाजारातून किल्ल्यांचे, गडाचे नकाशे विकत आणून त्यावरून किल्ले बनवले जायचे. ते काम गुगलने सोपे केले आहे. किल्ला बनवण्याआधी लागणाऱ्या साहित्याचा अंदाज घेऊन किल्ले बनवले जात आहेत.

एखादा किल्ला किती फुटाचा बनवायचा त्यावरून विटांचे, मातीचे व इतर साहित्याचे प्रमाण निश्चित केले जात आहे. दुर्गप्रेमी सांगतात, साधारणतः तीन ते साडेचार फुटांचा किल्ला बनवायला ६० ते ९० विटा लागतात. तसेच २० ते ३० गोणी माती लागते, तर जसजसे आकार कमी होतील तसे साहित्य कमी लागते. उन्हामुळे या किल्ल्याला भेगा पडू नयेत म्हणून या मातीत शेण मिसळले जाते. जर जलदुर्ग असेल तर त्याच्या उंचीत फरक पडतो, तसेच किल्ल्याची तटबंदी बनवण्यासाठी चुन्याचाही वापर केला जातो. या किल्ल्यांवर हिरवळीचा भाग दाखवायला हा किल्ला ओला असतो त्यावेळेस त्यात राई, हलीम, मोहरी पेरल्या जातात. दररोज थोडे थोडे पाणी त्या भागावर शिंपडले की, छोटी छोटी गवताची पाती उगवतात. काळ्या मातीत हिरव्या उगवलेल्या गवताने किल्ला आकर्षक वाटतो. त्यामुळे किल्ला अधिक उठावदार दिसतो. किल्ला पूर्ण झाला की मातीचा शिवाजी महाराजांचे लहान आकारातील पुतळा, मावळे, जंगली प्राणी, गावकरी त्यावर ठेवले जातात. त्यामुळे किल्ल्याचा इतिहास जिवंत झाल्यासारखा भासतो. या सजवलेल्या किल्ल्याला पाहण्यासाठी लहानांपासून मोठे गर्दी करतात.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस नोटीसव्दारे कळविण्यात येते की, आमचे आशिल यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत मौजे वात (कांबे), तालुका खालापुर, जि. रायगड. येथील शेतजमीन मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक सौ. मनिषा मनोज कुचेरिया यांच्या कडुन पुर्ण मालकी हक्काने खरेदी घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वात (कांबे), वालुका खालापुर, जि. रायगड.**

| अ.क्र. | मालकाचे नाव | सर्व्हे.नं. | हिस्सा नं | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | सौ. मनिषा मनोज कुचेरिया | ६१ | २ | ०.१६.०० | १.७३ |

सदर मिळकती वर आगर तिच्या कोणत्याही भागावर इतर कोणाला हक्क हितसंबंध व तारण, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, मत्युपत्राकीतदान साठेकरार वहीवाट दावा कोणाचाही कसलाही हक्क हित संबंध मालकीदान, बोजा जाणे येण्याचा मार्ग वगैरे असल्यास त्यांनी योग्य त्या कागदीपत्राच्या पुराव्यासह नोटीस प्रसिदध झाल्यापासुन (८) आठ दिवसाच्या आत खालीसही करणार त्यांच्या पत्यावर पुराव्यासह आपली हरकत नोंदवावी. या नंतर येणा–या तकारी अगर हरकती आमचे अशीलावर कोणत्याही कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही हे सर्व लोकांस कळावे.

**ठिकाण : कराडे बुद्रुक**
**दिनांक १२.११.२०२३**

**सही/–**
**ॲड. जितेंद्र धर्मराज जाधव**
**मु. कराडेबुद्रक, पो. गुळसुंदे,**
**ता. पनवेल, जि. रायगड.**
**पिनकोड ४१०२०७**
**मो. ९८६०८७६१४७**

# वाढत्या वायूप्रदूषणावर उपाययोजना

## खारघर टोलनाक्यावर वाहनांवर पाण्याची फवारणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हवेतील वायु गुणवत्ता निर्देशांक चढा न राहता धुलीकणाची मात्रा कमी करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांनी पनवेल महापालिकेला दिलेल्या आदेशानंतर काही तासातच पनवेल शीव महामार्गावरील खारघर टोलनाक्यावर पालिकेने वाहनांवर पाण्याची फवारणी करणारी यंत्रणा कार्यान्वित केली आहे. पहिल्यांदाच केलेल्या या प्रयोगामध्ये एका तासात साडेतीनशेहून अधिक वाहनांवर फवारणी करण्याचे काम शुक्रवारी (दि. १०) सायंकाळपासून सुरू झाल्याने हवेतील प्रदूषण कमी होईल अशी अपेक्षा आहे.

### पनवेल महापालिकेतर्फे यंत्रणा कार्यान्वित



पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी तातडीने याबाबतची उपाययोजना करण्याचे आदेश दिल्यानंतर काही तासांत पालिका प्रशासनाने खारघर टोलनाक्यावर पाण्याच्या टाकी व इतर यंत्रणा येथे कार्यान्वित केली आहे. याठिकाणी १० हजार लिटर पाण्याची टाकी बसविण्यात आली असून एकावेळी १२ नोझल टोलनाक्यावर सुरू आहेत. तसेच एका टाकीतील पाणी २ तासांत संपल्यानतंर पुन्हा नव्याने टाकी भरली जाते. तासाला ३०० ते ३५० गाड्यांवर हा पाणीमारा केला जात असल्याची माहिती आयुक्त देशमुख यांनी दिली आहे.

स्वत: आयुक्तांनी ही यंत्रणा व्यवस्थीत चालविली जाते का याचा आढावा घेतला. हे काम तातडीने करण्यासाठी घनकचरा आणि आरोग्य विभागाचे उपायुक्त सचिन पवार, पर्यावरण विभागाचे डॉ.वैभव विधाते, पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता विलास चव्हाण, अभियंता प्रितम पाटील, आणि त्यांच्या विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

यासाठी लागणारे पाणी सध्या पालिका कोपरा तलावातून आणले जात आहे. २४ तास ही यंत्रणा सुरू ठेवण्यात येणार आहे. यासाठी १२ ते १५ टँकर पाणी लागेल असे नियोजन पालिकेने केले आहे. पाण्याचा ही फवारणी पुढील पाच ते सहा दिवस सुरू राहणार आहे. वाहनांवर पाणी फवारणी करण्याचा हा प्रयोग पहिल्यांदाच राष्ट्रीय महामार्गावर केला जात आहे. यामुळे मुंबईमध्ये प्रवेश करणाऱ्या वाहनांवरील माती व धूळ कमी होऊन मुंबई शहरातील हवेतील धूलिकण कमी होण्यास मदत होणार आहे.

## उत्कर्ष ग्रामविकास मंडळाच्या विजयी उमेदवारांची मिरवणूक






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात न्हावे ग्रामपंचायतीत भाजप, राष्ट्रवादी, काँग्रेसपक्ष प्रणित उत्कर्ष ग्रामविकास मंडाळाचे सरपंचपदाच्या उमेदवार तसेच ११पैकी आठ सदस्य भरघोस मतांनी निवडणूक आहेत. या सर्व नवनिर्वाचित सरपंच आणि सदस्यांची विजय मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात शुक्रवारी (दि. १०) काढण्यात आली.

न्हावे ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंचपदी विजेंद्र पाटील, तर सदस्यपदी सागरशेठ ठाकूर, नरेश मोकल, शैलेश पाटील, राजेंद्र म्हात्रे, रंजना पाटील, ललिता ठाकूर, सुनिता भोईर, जागृती म्हात्रे हे निवडणूक आले आहेत. या सर्व उमेदवारांची विजय मिरवणूक काढण्यात आली. या वेळी ठिकठिकाणी त्यांचे आरती करून जोरदार स्वागत करण्यात आले.

या वेळी माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, सागरशेठ ठाकूर, सी. एल. ठाकूर, माजी उपसरपंच प्रल्हाद पाटील, तुषार भोईर, देवेंद्र भोईर, विजया ठाकूर, मंजुषा ठाकूर, किशोर घरत, संजय ठाकूर, चंद्रकांत पाटील, मिनाक्षी पाटील, रंजना घरत, कमळाबाई म्हात्रे, सुशीला पाटील, राकेश पाटील, राजेश म्हात्रे, नवनाथ म्हात्रे, भुषण भोईर, आर. के. म्हात्रे, बाळुशेठ भोईर, किशोर भोईर, गायकवाड गुरुजी, प्रकाश कडू, राजेश घरत, उत्तम म्हात्रे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## ‘पनवेल टाइम्स’च्या दिवाळी अंकाचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सद्यस्थितीतील घडामोडी, लेखक-कवींचे साहित्य यामुळे पनवेल टाइम्सचा दिवाळी अंक वाचकांसाठी पर्वणी ठरेल, असे उद्‌गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्सच्या दिवाळी विशेषंकाच्या प्रकाशन समारंभात केले.

या प्रकाशन समारंभास उद्योजक नंदू वाजेकर, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, पनवेल टाइम्सचे संपादक गणेश कोळी, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, सुंमत नलावडे उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

पनवेल टाइम्सचे संपादक गणेश कोळी यांनी आपल्या प्रास्ताविकात, दिवाळीसारख्या उत्सवातून महाराष्ट्राची संस्कृती जपली जात आहे. फराळाप्रमाणेच दिवाळी अंकातून वाचन संस्कृती जोपासली जाते. महाराष्ट्रातील वास्तव घटनांचा पनवेल टाइम्सच्या दिवाळी अंकातून घेतला असल्याचे सांगितले.

## भारत विकास परिषदेतर्फे सैनिकांना दिवाळी फराळ भेट

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळीच्या सणाचा उत्साह देशभरात पहावयास मिळत असताना, भारत विकास परिषदेच्या पनवेल शाखेने पाठविलेला फराळ देशाच्या बारामुल्ला, राजौरी, नौशेरा सेक्टर, जम्मू राजस्थान, अखनूर जम्मू आदी ठिकाणच्या सीमेवर रक्षण करणाऱ्या जवानांनी चाखल्याने परिषदेच्या सदस्यांनीदेखील आनंद व्यक्त केला.

पनवेलमधून गणेशोत्सव झाला की भारतीय सैन्यदलाची परवानगी घेऊन दरवर्षी या उपक्रमाअंतर्गत दसऱ्यापासून फराळ घेऊन पॅकिंग करण्यास सुरुवात होते. यावर्षी भारत विकास परिषदेच्या सदस्यांनी १० हजार बॉक्स तयार केले. आपण आनंदाने सण साजरा करीत असताना देशासाठी लढणाऱ्या सैनिकांना देखील या सणाचा आनंद घेता यावा, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येतो. एका बॉक्समध्ये १५० ग्राम शेव, सहा चकल्या, चार लाडू, १५० ग्रॅम चिवडा आदी पदार्थ- दिले जातात.

पदार्थ बनविताना थंड प्रदेशात टिकून राहतील, याची विशेष काळजी भारत विकास परिषद घेत असल्याची माहिती सचिव पद्मजा कुलकर्णी यांनी दिली. दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवानंतर या फराळाची तयारी करण्यात आली होती. सैनिकांसाठी मोठ्या प्रमाणात हा फराळ तयार केला जातो.

## सीकेटी महाविद्यालयात आंतरविभागीय कुस्ती स्पर्धा रंगली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स व सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन १० व ११ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत ९०पेक्षा जास्त कुस्तीपटूंनी सहभाग घेत प्रतिसाद दिला.



या स्पर्धेवेळी मुंबई विद्यापीठाचे क्रीडा आणि शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. मोहन आमृले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बी.डी. आघाव, कला शाखेचे प्रमुख डॉ.बी.एस. पाटील, रुसा समन्वयक डॉ. एस.एन. वाजेकर, जिमखाना समितीचे अध्यक्ष डॉ.व्ही.बी. नाईक उपस्थित होते.

स्पर्धेत मुंबई विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा व पंचांचा समावेश होता. विजयी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.आर.व्ही. येवले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार ए.बी. नाक्ती यांनी मानले.

स्पर्धा आयोजन व यशस्वी केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे यांनी कौतुक केले.








दिवाळी पहाट







पनवेल : प्रमोद वालेकर संपादित दैनिक किल्ले रायगडच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. या वेळी संपादक प्रमोद वालेकर, सहसंपादक प्रदीप वालेकर, मुख्य प्रतिनिधी तुषार तटकरी, जाहिरात प्रतिनिधी उमेश भोईर आदी उपस्थित होते. (छाया : योगेश पाटील)



कळंबोली : भाजप कळंबोलीतर्फे दिवाळीनिमित्त स्वच्छतादूतांना मिठाई वाटप करण्यात आली. या वेळी भाजप मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी सभापती प्रमिला पाटील, उत्तर भारतीय अध्यक्ष केशव यादव, पमपा स्वच्छता निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे, अमृतलाल चव्हाण आदी उपस्थित होते.

Wish You All a Very
Happy Diwali
With best compliment From
ANSHUL SPECIALTY MOLECULES PVT. LTD
MANUFACTURES OF CHEMICALS
Factory :- Plot No. 108/109/110, MIDC, Village - Roth Budruk, Tal. Roha, Dist. Raigad - 402 116. Tel. : (02194) 263581/263583. Fax: 2638888
Regd. Office : Flexcel Park, C - Wing, 2nd Floor, S. V. Road, Near 24 Karat Multiplex, Jogeshwari (West) Mumbai - 400 102. Tel. : 021 - 62252900

# रेल्वे गोदामातील कामगारांची आता श्रम नोंदणी होणार!

## विविध शासकीय योजनांचा मिळणार लाभ

**पेण : प्रतिनिधी**

रेल्वे गोदामात काम करणाऱ्या कामगारांसाठी ही दिवाळी गोड झाली आहे. या कामगारांची श्रम नोंदणी करण्याचे आदेश राज्य उपमुख्य कामगार आयुक्तांनी मध्य रेल्वे मुंबई, पश्चिम रेल्वे मुंबई व कोकण रेल्वे या तीन झोनच्या जनरल मॅनेजरना ई-श्रम पोर्टलमध्ये माहिती संकलित करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे रेल्वे गोदामात काम करणाऱ्या कामगारांना इतर रेल्वे कामगारांप्रमाणे सर्व विविध शासकीय सुविधा मिळणार आहे. त्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.



भारतीय रेल्वे माल गोदाम श्रमिक संघाचे महामंत्री अरुणकुमार पासवान राष्ट्रीय प्रभारी मनोरंजन कुमार आणि राष्ट्रीय संघटन मंत्री दिगंबर प्रसाद मेहेता यांनी भारतीय रेल्वे माल गोदाम श्रमिक संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य अंतर्गत रेल्वे गोदाम कामगारांची ई-श्रम नोंदणी करण्याची मागणी केली होती. त्याची दखल घेऊन राज्य उपमुख्य कामगार आयुक्तांनी आदेश दिले आहेत.

यानिमित्ताने श्रमिक संघाच्या मुंबई झोनतर्फे दिवाळी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपमुख्य कामगार आयुक्तांनी रेल्वे झोनला पाठवलेल्या पत्राचे वाचन करण्यात आले. त्याविषयी माहिती उपस्थितांना देण्यात आली. या संदर्भात राज्याचे उपमुख्य कामगार आयुक्तांनी मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, कोकण रेल्वे यांना पत्र देऊन तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिल्याची माहिती दक्षिण पूर्व मध्य रेल्वे बिलासपूर झोनचे प्रमुख हिम बहादूर सोनार यांनी दिली. केंद्र सरकारकडे कामगारांसाठी केलेल्या मागणीच्या दिशेने कामगारांनी हे पहिले पाउल टाकले आहे. यासाठी भारतीय रेल्वे माल गोदाम श्रमिक संघ कामगार संघटनेने प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.

मेळाव्याला मध्य रेल्वे झोनचे अध्यक्ष विशाल भगत, झोनल उपाध्यक्ष प्रदीप लांगी, झोनल सचिव संतोष थोरात, सहसचिव दीपक मोकल, संघटन मंत्री अमोल झवेरी, खजिनदार रमेश भरकले, राज्य सचिव महेश लहाने, अमित नाईक, जगदीश पाटील, संजय पाटील, मुंबई झोनल अध्यक्ष अनंत काटकर, रुपाली मोकल, सोलापूर विभाग अध्यक्ष प्रकाश डोंगरे यांच्यासह विभागीय राज्य व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन अविनाश मोरे तर आभार रमेश भरकले यांनी मानले.

# अवकाळी पावसामुळे रोह्यात भातशेतीचे नुकसान

## पीक सुकविण्यासाठी शेतकऱ्यांची कसरत






**रोहे : प्रतिनिधी**

या वर्षी समाधानकारक पाऊस पडल्याने भातपिक चांगले आले होते. तालुक्यातील भातकापणी अंतिम टप्प्यात असताना मात्र गेल्या तीन दिवसांपासून अवकाळी पावसाने तडाखा दिला. त्यामुळे भातशेतीचे नुकसान झाले असून कापलेले भात सुकविण्यासाठी शेतकऱ्यांची कसरत सुरू आहे.

तालुक्यात तीन दिवस दीड ते दोन तास पडलेल्या अवकाळी पावसामुळे भातशेतीचे नुकसान झाले आहे. देवकान्हे, खांब, धाटाव विभागात काही प्रमाणात आलेल्या पावसामुळे भिजला आहे. कापलेला भात ओला झाला आहे. शेतात रचलेल्या भातावर प्लास्टिक व ताडपत्री टाकण्यात आले आहे. उन्ह पडल्यानंतर भात झोडपताना शेतकरी दिसत आहे. तालुक्यातील १००च्या आसपास शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. भातशेतीचे नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.

# कोमसाप माणगाव शाखेचा दिवाळी पहाट कार्यक्रम उत्साहात



**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद माणगाव शाखेच्या वतीने शनिवारी (दि. ११) येथील कुणबी भवनमध्ये दिवाळी पहाट कार्यक्रम अत्यंत उत्साहात झाला. कार्यक्रमास रसिक प्रेक्षकांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमास कोमसाप जिल्हा समन्वयक अ. वि. जंगम, युवा प्रमुख सिद्धेश लखमदे, तळा शाखा अध्यक्ष हेमंत बारटक्के, नगरसेवक अजित तार्लेकर, संगीता बक्कम आदींसह विविध साहित्यिकांची उपस्थिती होती. शाखा अध्यक्ष अजित शेडगे, रुपेश शेठ, ज्योती बुटाला, अपर्णा जंगम, मधुरा पालांडे, तनुजा मेहता, पूजा उभारे, इशान्वी म्हात्रे, कल्पना ठाकूर, स्मिता पाबरेकर, श्रद्धा अंबुर्ले, स्नेहल परांजपे, आर. टी. पवार, आर्य जंगम, डॉ. चंद्रशेखर साकोलिकर, भानुप्रिय मेहता आदींनी अत्यंत उत्साहात कार्यक्रम सादर केले. लहानग्या आरोही जंगम हिने बहारदार नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे निवेदन अपर्णा जंगम, मधुरा पालांडे यांनी केले. कार्यक्रमास टीडब्लूजे, माणगाव नागरिक सेवा फाउंडेशन व नगरसेवक अजित तारलेकर आदींनी सहकार्य केले.

# 'अंनिस'तर्फे पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील यांची कार्यशाळा

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन कायदा २०१३च्या दशकपूर्तीनिमित्त अंनिसच्या जादूटोणाविरोधी कायदा जनसंवाद यात्रा काढण्यात आली आहे. यानिमित्त माणगाव पोलीस स्टेशन येथे जादूटोणा व अघोरी प्रथा प्रतिबंधक कायदा २०१३बाबत जनजागृती व्हावी, कायद्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी पोलीस कर्मचारी आणि पोलीस पाटील यांच्यासाठी कायदा प्रशिक्षण झाले.

या वेळी अंनिसच्या राज्य कार्यकारिणी सदस्य व देवदासी जटा प्रथा निर्मूलन कार्यकर्त्या नंदिनी जाधव यांनी पोस्टरच्या माध्यमातून कायद्यातील विविध तरतुदी व १२ अनुसूचींची माहिती दिली.

या कार्यक्रमाची सुरुवात उपविभागीय पोलीस अधीक्षक नितीनकुमार पोंदकुले यांच्या हस्ते अंनिस कार्यकर्ते भगवान रणदिवे यांच्या पाण्याचा दिवा पेटवणे या प्रयोगाने झाली. अंनिस जिल्हा कार्याध्यक्ष मोहन भोईर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. माणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत व कार्यक्रमासाठी उत्कृष्ट व्यवस्था केली होती.

अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राचे संपादक संपादक राजीव देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राज्य सल्लागार व ज्येष्ठ कार्यकर्ते भाऊ सावंत यांनी विशेष परिश्रम घेतले.



# उसर प्रकल्पग्रस्तांचे साखळी उपोषण सुरूच

**रेवदंडा : प्रतिनिधी**

उसर प्रकल्पग्रस्तांच्या संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीने १५ सप्टेंबर रोजी गेल इंडिया कंपनी व्यवस्थापनाविरोधात मागण्यांच्या पूर्ततेसाठी सुरू केलेले साखळी उपोषण दोन महिने होत आले तरी अद्याप सुरू आहे. अंतिम चर्चेचा दिवस वारंवार पुढे ढकलला जात असल्याने संघटनेने नाराजी व्यक्त केली आहे.




यापूर्वी सप्टेंबरमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी कंपनी व्यवस्थापन अधिकारी वर्गासोबत उसर गेल येथे सभा घेतली होती. त्या वेळी समितीने आंदोलन स्थगित केले होते, परंतु कंपनी व्यवस्थापनाचे आश्वासन कागदावरच राहिल्याने संप्तत प्रकल्पग्रस्तांनी १५ सप्टेंबरपासून कंपनी गेटसमोर साखळी उपोषण सुरू केले असून येत्या १५ नोव्हेंबर रोजी दोन महिने पूर्ण होतील.

जिल्हाधिकाऱ्यांच्या मध्यस्तीने संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समिती व गेल इंडिया व्यवस्थापनाशी चर्चा ३ ऑक्टोबर रोजी आयोजित केली होती, परंतु कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चर्चा घडविण्याचा आग्रह उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांनी घेतल्याने ही चर्चा पुढे ढकलण्यात आली. अंतिम चर्चा करण्याची मुदतवाढ आंदोलन समितीने मान्यता दिली होती, परंतु अद्याप अंतिम चर्चा होत नसल्याने नाराजी व्यक्त करीत आहेत.

# माणगावात रोजगार मेळावा; जॉबकार्डचेही वाटप

**रोहे : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्लिश हायस्कूल, जावळी येथे २४ नोव्हेंबर रोजी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सुतारवाडी येथील गीताबाग येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली.

या वेळी आमदार अनिकेत तटकरे, माजी उपसभापती रामचंद्र सकपाळ आदी उपस्थित होते. या मेळाव्यात रायगड जिल्ह्यातील कारखान्यांसह मुंबई, ठाणे, पुणे येथील मोठ्या कंपन्या सहभागी होणार आहेत. मेळाव्यातून सात ते आठ हजार युवक व युवतींना रोजगार मिळणार आहे.



याचा लाभ बेरोजगार युवकांनी घ्यावा, असे आवाहन ना. आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांनी केले आहे.

या मेळाव्यात पाचवी ते पदव्युत्तर शिक्षण झालेल्या बेरोजगारांना सहभागी होता येणार आहे. ज्यांना मेळाव्यात रोजगार मिळणार नाही त्यांना जॉबकार्डही देण्यात येणार आहे. मेळाव्यात ज्यांना नोकरी मिळेल त्यांना त्याच ठिकाणी नोकरीचे प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे सांगितले.

# पीक विमाधारक शेतकऱ्यांना नुकसानीची पूर्वसूचना देण्याचे निर्देश

**मुरूड : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पिक विमा योजनांतर्गत सहभागी शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईकरिता विमा कंपनीला पूर्वसूचना द्यावी. प्रधानमंत्री पिकविमा योजना ही चालू खरीप हंगामामध्ये तालुक्यामध्ये चोलामंडलम जनरल इन्शुरन्स कंपनीतर्फे राबविण्यात येत आहे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी केले आहे.

भात, नाचणी व उडीद ही पिके अधिसूचित असून योजनेमध्ये चालू खरीप हंगामामध्ये तालुक्यातील १,८८९ इतक्या शेतकऱ्यांनी पीकविमा काढला आहे. बुधवारपासून काही ठिकाणी पाऊस पडला आहे, तसेच पुढील तीन-चार दिवस हवामान विभागाने पावसाचा अंदाज वर्तविला आहे. काढणीपश्चात या बाबी अंतर्गत अधिसूचित पीक कापणी करून सुकवण्यासाठी ठेवलेले असताना कापणीपासून जास्तीत जास्त दोन आठवड्यांत (१४ दिवस) गारपीट, चक्रीवादळ यामुळे पडलेला पाऊस व अवकाळी पाऊस यापैकी जे कारण असेल ते नमूद करून नुकसानीची माहिती देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने विमाधारक शेतकऱ्यांनी सर्व्हे नंबरनुसार बाधित पिक व क्षेत्राबाबत घटना घडल्यापासून ७२ तासांच्या आत संबंधित विमा कंपनीस कळवणे आवश्यक राहील. पिक नुकसानी बाबतची पूर्वसचना Crop Insurance App किंवा विमा कंपनीचा टोल फ्री क्रमांक, विमा कंपनीचे जिल्हा व तालुका स्तरावरील कार्यालय, विमा कंपनीचा ई-मेल, संबंधित बँक किंवा कृषी विभाग यांना देण्यात यावी.

सर्व कार्यवाही योजनेच्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून केली जाईल. विमाधारक शेतकऱ्यांनी नुकसानभरपाईसाठी तक्रार नोंदवताना योग्य ती खबरदारी घेऊनच नुकसानग्रस्त क्षेत्राच्या नुकसानीच्या पूर्वसूचना विहित कालावधीत नोंदवाव्यात. अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी केले आहे.

# परदेशात नोकरीची ऑफर देऊन दोन तरुणींची फसवणूक

## पोलिसांच्या सतर्कतेमुळे सुखरूप सुटका

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

नोकरीच्या अमिषाला बळी पडून घरातून बाहेर पडलेल्या दोन तरुणी देशाबाहेर जाणार होत्या, मात्र स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने तातडीने या बेपत्ता तरुणींचा शोध घेत गुजरातमधून त्यांना सुखरूप आणून त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले.


१८ व १९ वर्षीय दोन मैत्रिणींची सोशल मिडीयामार्फत एका तरुणासोबत ओळख झाली होती. आपल्या जाळ्यात तरुणी अडकल्याचे लक्षात आल्यावर त्याने त्यांना नोकरीचे अमिष दाखवले. त्याच्या अमिषाला बळी पडून सोमवारी (दि. ६) पहाटे सर्वजण साखरझोपेत असताना दोघीजणी घरातून बाहेर पडल्या. कल्याण, पनवेलमार्गे गुजरात न जाता, पुणे मार्गे त्या गुजरातला गेल्या. मुली बेपत्ता झाल्याची माहिती मिळताच नातेवाईकांनी अलिबाग पोलीस ठाण्यात हरविल्याची तक्रार केली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाकडे दिला. पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांच्या नेतृत्वाखाली दोन पथक तयार करण्यात आले. वेगवेगळ्या माध्यमातून माहिती घेण्यात आली. पुणे व गुजरातमध्ये पथक पाठविण्यात आले.

या दोघी गुजरात राज्यातील खेडा जिल्ह्यातील एका घरात असल्याचे समजले. या दोघींना ताब्यात घेऊन त्यांना सुखरूप त्यांच्या नातेवाईकांकडे सुपूर्द केले. त्या तरुणींना नोकरी देण्याच्या बहाण्याने विदेशात पाठविण्याचा त्याचा प्लॅन होता, मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा त्याचा डाव हाणून पाडला. तांत्रिक बाबीद्वारे त्यांचा शोध घेण्यात यश आले, मात्र या प्रकरणाबाबत आणखी वेगळ्या मार्गाने पोलीस तपास करीत आहेत.

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात वसुबारस

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील वरसे येथील दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र सुयश कॉलनी येथे गुरुवारी (दि. ९) दिपावलीच्या पहिल्याच दिवशी वसुबारसचा उत्सव अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.




यानिमित्ताने गोमातेचे आणि वासराचे श्री स्वामी समर्थ सेवेकरी बंधू आणि भगिनींनी मनोभावे पुजन केले. हा कार्यक्रम केंद्राच्या कृषी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला होता.

# दिवाळीनिमित्त रायगडातील बाजारपेठा गजबजल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठा गजबजल्या असून, खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होताना दिसत आहे. रेडीमेड कपडे, दागिने, दुचाकी, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, मोबाईल, लॅपटॉप, एलईडी, घरखरेदी, गृहपयोगी वस्तू यांची खरेदी मोठ्या प्रमाणावर होत आहे. शिवाय पूजेसाठी लागणारी फुले, आकाश कंदील, फटाके ,रांगोळी, मिठाई, फराळ आदी खरेदीची



बाजारपेठेत लगबग दिसत होती.

खास सवलत, मोफत भेटवस्तू तसेच फायनान्स ऑफर्स देऊ केल्या आहेत. नवनव्या फॅशनच्या कपड्यांनी दुकाने सजली आहेत. मुहूर्तावर टीव्ही, फ्रीज, वातानुकूलित यंत्र, ओव्हन, एलसीडी, संगणक यांसारख्या वस्तू खरेदीला प्राधान्य दिले जात आहे. वाहनांची आगाऊ नोंदणी मोठ्या संख्येने होत आहे.

मिठाई, ड्रायफ्रुट्स तसेच तयार फराळ खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होत आहे. रस्त्यावर लावलेल्या स्टॉलवर आकाशकंदील, रांगोळी, फुले, पणत्या, फटाके आदी दिवाळीनिमित्त लागणाऱ्या वस्तूंची खरेदीसाठी रात्री उशीरापर्यंत ग्राहकांची वर्दळ होती.

# उपांत्य फेरीत पोहचलेल्या भारताचा आज नेदरलँड्सविरुद्ध सामना

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

यंदाच्या क्रिकेट विश्वचषकात भारतीय संघाने दमदार कामगिरी केली आहे. सर्व भारत आठ सामन्यांत विजय मिळवून गुणतालिकेत १६ गुणांसह अव्वल स्थानी आहे. विजयरथावर



स्वार झालेला भारत रविवारी (दि. १२) नेदरलँडशी भिडणार आहे. साखळी फेरीतील हा शेवटचा सामना असेल.

भारतीय संघ आधीच उपांत्य फेरीत पोहचला आहे. त्याचबरोबर नेदरलँडचा संघ चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पात्र होण्यासाठी संघर्ष करीत आहे. संघाच्या खेळाडूंनी शेवटच्या लीग सामन्यापूर्वी बंगळुरूमध्ये फुटबॉलचा आनंद लुटला. भारत आणि नेदरलँड्स यांच्यातील सामना बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर होणार आहे.

# ऑस्ट्रेलियाचा बांगलादेशवर सहज विजय; मार्शचे शतक

**पुणे** : ऑस्ट्रेलियाने वन डे वर्ल्डकप स्पर्धेतील विजयी मालिका कायम राखताना साखळी फेरीतील अखेरच्या लढतीत बांगलादेशवर दणदणीत विजय मिळवला. मिचेल मार्शच्या नाबाद १७७ धावांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने आठ विकेट्स राखून हा सामना जिंकला. गुरुवारी त्यांच्यासमोर उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचे आव्हान असणार आहे. कोलकाताच्या ईडन गार्डनवर ही मॅच होईल. तोवहिद हृदोयचे अर्धशतक अन् कर्णधार नमजूल होसैन शांतो यांच्या फटकेबाजीने बांगलादेशने तीनशेपार धावा (५० षटकांत ८ बाद ३०६) केल्या. मिचेल मार्शने शतक झळकावून ऑस्ट्रेलियाला विजयाच्या दिशेने कूच करून दिली. मार्शे १३२ चेंडूंत १७ चौकार व नऊ षटकारांच्या मदतीने नाबाद १७७ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने ४४.४ षटकांत विजय साकारला.

# वर्ल्डकपमधून पाकचे पॅकअप्

**कोलकाता : वृत्तसंस्था**

वनडे वर्ल्डकप स्पर्धेतील पाकिस्तान संघाचे आव्हान शनिवारी (दि. ११) संपुष्टात आले. इंग्लंडविरुद्धची त्यांची लढत केवळ औपचारिकता ठरली.

न्यूझीलंडने गुरुवारी श्रीलंकेला पराभूत करून चौथे स्थान पक्के केले होते. त्यानंतर पाकिस्तान संघ जर तरच्या गणितात अडकला आणि त्यांच्यासमोर अशक्यप्राय समीकरण उभे राहिले. त्यात इंग्लंडचा कर्णधार जॉस बटलर याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यांनी ५० षटकांत नऊ बाद ३३७ धावांचा डोंगर रचला. पाकिस्तानला इंग्लंडचे आव्हान ६.१ षटकांत त्रिशतकी लक्ष्य पार करावे लागणार होते, मात्र त्यांना ते शक्यच नव्हते.

पाकिस्तानला उपांत्य फेरीत प्रवेश पक्का करण्यासाठी इंग्लंडविरुद्ध प्रथम फलंदाजी करून किमान २८८ धावांनी विजय मिळवावा लागणार होता. अन्यथा इंग्लंडने प्रथम फलंदाजी केल्यास ते जे काही लक्ष्य ठेवतील ते सहा षटकांत पार करावे लागेल अशी परिस्थिती होती. इंग्लंडने मोठे लक्ष्य दिल्यानंतर पाकिस्तान सामना पूर्ण होण्यापूर्वीच विश्वचषकातून बाहेर झाला.

















